# पंडित नेहरुच्या विचारांची प्रासंगिकता

**डॉ. एम. ए. केसरकर,** राज्यशास्त्र विभाग के.एम.सी. कॉलेज, खोपोली

## प्रस्तावना

मानवतेचा एक महान पुजारी आणि भारताचा एक अद्‌वीतीय नेता जेव्हा आपल्या देहाचा कणन्—कण मातृभूमीच्या मातीत मिसळावा अशी अंतिम इच्छा प्रकट करतो. तेव्हा त्याच्यातील ज्वलंत राष्ट्रवाद प्रत्ययास येतो. नेहरु हे प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांच्या अणूरेणूत राष्ट्रचसह भिनला होता. भारताच्या सर्वांगिण उत्कर्षासाठी त्यांनी आपला देह झिजवला. त्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शांतता आणि प्रगती या मानवतेच्या अत्युच्च ध्येयासाठी आपले सर्वस्व वेचले होते.

जवाहरलाल नेहरु यांचा जन्म अलाबाद येथे १४ नोव्हेंबर १८८९ मध्ये एका खानदानी, सुसंस्कृत व संपन्न अशा काश्मिरी ब्राम्हण कुंटूबात झाला. त्यांचे बालवयात नेहरुंच्या व्यक्तिमत्वावर छाप पाडणाऱ्या ज्या दोन व्यक्ती होत्या त्यापैकी मोतीलाल नेहरु ही व्यक्ती आणि दुसरी व्यक्ती महात्मा गांधी ही होय. १९१६ साली लखनौ—काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी त्यांची महात्मा गांधींशी पहिली भेट झाली. याचवर्षी नेहरुंचा कमलेशी विवाह झाला. १९१६ सालात लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांच्या नेतृत्त्वाखाली ज्या दोन वेगवेगळया 'होमरुल लीग' या संघटना स्थापना झाल्या. त्या दोन्हींमध्ये जवाहरलाल नेहरुंनी कार्य सुरु केले. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी भारताला अंतर्गत स्वायत्तता दयावी अशी मागणी करणाऱ्या या संस्था होत्या. १५ एप्रिल १९१९ रोजी जनरल डायरने जालियनवाला बागेत केलेल्या गोळीबाराचा निषेध करणारी जी जळजळीत भाषणे जवाहरलालजींनी ठिकठिकाणी केली. त्यामुळे जनतेचे मन त्यांच्याकडे अधिक आकृष्ट झाले. पण जवाहरलालजींनी खरी राष्ट्रव्यापी लोकप्रियता लाभली ती १९२०—२१ सालात, गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या सत्याग्रह संग्रामामध्ये १९२६ साली ते अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस झाले. १९२७ च्या फेब्रुवारी महिन्यात ब्रुसेल्स येथील दलित राष्ट्रसमूहाच्या परिषदेला राष्ट्रसभेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित राहिले. १९२९ साली ते लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष झाले. याच अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत करण्यात आला. नेहरुंनी काँग्रेसच्या या व्यासपीठावरुन समाजवादाचा पुरस्कार केला.

१४ एप्रिल, १९३० रोजी मिठाच्या सत्याग्रहात नेहरुंना अटक झाली. तेव्हा त्यांना सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९३० ते १९३६ पर्यंत नेहरुंना कायदेभंगाबाबत व स्वातंत्र्य चळवळीबाबत अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला. याच काळात त्यांना लेखन वाचन करण्यास वेळ मिळाला. १९३६ साली लखनौ काँग्रेसचे अध्यक्ष झाले. १९३७ साली त्यांची तिसऱ्यांदा काँग्रेस अध्यक्ष म्हणून निवड झाली. १९३९ साली जवाहरलाल नेहरुंनी चीनला भेट दिली. १९४० साली बॅ. जीनांनी द्विराष्ट्र सिध्दांत मांडला होता. नेहरुंनी तो अमान्य केला. त्याचवर्षी त्यांना चार वर्षांची कारावासाची शिक्षा झाली. परंतु १९४१ साली त्यांना इतर पुढाऱ्यांबरोबर सोडण्यात आले. १९४२ साली त्यांना मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनात 'चलेजाव' चा ठराव पास झाला. 'चलेजाव' च्या आंदोलनात सहभाग घेतल्यानंतर नेहरुंना अटक करण्यात आली. त्यांना १९४५ पर्यंत अहमदनगरच्या किल्ल्यात (तुरुंगात) ठेवण्यात आले. १९४६ साली ते पुन्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. याचवर्षी हंगामी सरकार बनविले गेले. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. व पंडीत जवाहरलाल नेहरु भारताचे पहिले पंतप्रधान झाले. १९४७ ते १९४७ पर्यंत त्यांनी पंतप्रधान म्हणून काम पाहिले. जागतिक शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. राष्ट्रराष्ट्रांतील तंटे, युद्‌ध मिटविण्यासाठी नेहरुंनी सतत भाग घेतला आणि युनो संघटनेची प्रतिष्ठा वाढविली. भारताची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्यांनी विविध राष्ट्रांना भेटी दिल्या. आणि स्नेहसंबंध सुधारले. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांनी केलेले कार्य एवढे प्रचंड आहे की, त्यांना 'शांतिदूत नेहरु' म्हणून जग ओळखते. पंचशील तत्त्वे मांडून त्यांनी मानवतावादाचा, बंधुत्वाचा दिव्य संदेश दिला. १९४८ ते १९६१ या काळात त्यांनी विविध देशांना दिलेल्या भेटी व कार्य यावरुन त्यांचे परराष्ट्रविषयक धोरण व जागतिक शांतता या

विषयीचे कार्य अधिक समजून येते. १९४८ साली नेहरुंनी पॅरिस येथे संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या खास बैठकीसमोर भाषण कले. १९४९ साली अमेरिका व कॅनडा या देशांच्या कायदेमंडळात भाषणे केली. १९५४ साली नेहरुंनी पंचशील तत्त्वांची जगाला अमूल्य देणगी दिली. १९६१ साली नेहरु बेलग्रेड येथील तटस्थ राष्ट्राच्या शिखर परिषदेत उपस्थित राहिले. पंडित जवाहरलाल नेहरुंनी आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आढावा घेऊन भारताने अलिप्तवादी शांततावादी निस्वातंत्र्य असे परराष्ट्रीय धोरण स्वीकारणे आवश्यक असल्याची भूमिका घेतली. राष्ट्राराष्ट्रांमध्ये शांतता, सहकार्य व मैत्री असावी असे त्यांना नेहमी वाटत असे. अशाप्रकारे पंडित नेहरु मानवतावादी आणि आंतरराष्ट्रवादी नेते होते. परंतु त्यांचा राष्ट्रवाद हा आंतरराष्ट्रवादापेक्षाही प्रखर होता. ते प्रखर राष्ट्रवादी होते. देशाचे हित सर्वांगिण विकास या गोष्टींना सर्वोच्च स्थान त्यांच्या हृदयात होते. ते प्रथम राष्ट्रवादी होते. आणि आपल्या राष्ट्रीय गरजांच्या व्यापक आकलनातून नंतर ते आंतरराष्ट्रीयवादी बनले होते. त्यांनी आपल्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत देशाची अव्याहतपणे सेवा केली. परंतु १९६२ साली चीनच्या आक्रमणामुळे देशाला पराभव पत्करावा लागला. नेहरुंच्या आयुष्यातील तो एक मोठा आघात समजावा लागेले. तरीपण नेहरुंनी आपले शांततावादी धोरण पुढे चालूच ठेवले. लोकशाही मार्गाने या देशांत समाजवाद आणण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. अशा या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किर्तीच्या महान नेत्याचे २७ मे १९६४ रोजी दिल्ली येथे देहवसान झाले. नेहरुंनी बालवयात एक नामांकित व आदर्श शिक्षक एफ.टी.ब्रुक्स यांचे मार्गदर्शन लाभले. बालवयात त्यांनी स्कॉट, डिकन्स, यॅकरे यांच्या कादंबऱ्यांचे वाचन केले. नेहरु वयाच्या १३ व्या वर्षी थिऑसफिकल सोसायटीचे सभासद होते. विज्ञान व थिऑसफिचे ज्ञान त्यांना ब्रुक्सकडून मिळाले. आणि ॲनी बेझंट बाईकडून काही वर्षे थिऑसफीचे धडे मिळाले. तसेच त्यांनी गॅरिवाल्डीचे पुस्तके वाचली. त्यातूनच त्यांची राष्ट्रवादाची भावना बळावली. १९१६ साली त्यांची गांधीशी पहिली भेट झाली. गांधीजींच्या राजकीय विचारांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. ते गांधीजींचे सच्चे अनुयायी बनले. जेव्हा साहित्यिक व विद्वान लोकांना शांततेचा काळ लाभतो. तेव्हाच त्यांच्याकडून उत्तम साहित्यनिर्मिती होते. या अनुभवानुसार नेहरुंनी आपले राजकीय विचार विविध ग्रंथातून प्रकट केले. नेहरुंनी आपले काही महत्त्वाचे ग्रंथ तुरुंगात असतानाच लिहले. 'सोव्हिएट रशिया' हा ग्रंथ नेहरुंनी १९२९ साली लिहला. 'पित्याने कन्येला लिहलेली पत्रे Letter From a Father to his daughters हा ग्रंथ १९३० साली प्रकाशित झाला. १९३० साली 'नैनी' तुरुंगात असताना त्यांनी आपले आत्मचरित्र लिहले. पुढे ते १९३६ साली प्रकाशित झाले. 'जागतिक इतिहासाचे ओझरते' दर्शन हा ग्रंथ १९३९ साली प्रकाशित झाला. 'भारताचा शोध' Discovery of India अहमदनगरच्या किल्ल्यात कारावास भोगत असताना १९४४ मध्ये लिहला.

त्यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ इतिहासावरील एक श्रेष्ठ ग्रंथ म्हणून ओळखला जातो. डिस्कव्हरी ऑफ इंडियाच्या अर्ध्या भागात ब्रिटिश अंमल भारतात येण्यापूर्वीच्या कालखंडाले तात्विक व ऐतिहासिक विवेचन केलेले आहे. आणि उरलेल्या अर्ध्या भागात ब्रिटिश अंमल काळात जगभर झालेली भौतिक व वैचारिक क्रांती, दोन महायुध्दे, देशातील आर्थिक व राजकीय आंदोलने, काँग्रेसची प्रगती, गांधी, टिळक, टागोर इत्यादींची थोरवी व कार्ये समाजवाद, स्वातंत्र्याची गरज इत्यादी अनेक महत्त्वाच्या विषयांचे तात्विकदृष्टया विवेचन व ऐतिहासिकदृष्टया अवलोकन केलेल आढळते. पंडीत नेहरुंचा राष्ट्रवाद हा केवळ स्वातंत्र्याप्राप्तीसाठीच होता असे नाही तर स्वातंत्र्यप्राप्त झाल्यानंतरही त्यांनी राष्ट्राच्या सेवेसाठी विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. राजकीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुध्द लढा दिला असला तरी त्यांना आर्थिक विषमता, दारिद्रय बेकारी याविरुध्द लढा देवून सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करावयाचे होते. १९४७ ते १९६४ या कालखंडात त्यांनी केलेल्या कार्यावरुन त्यांच्या राष्ट्रावादाची महती पटते. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी नियोजन, लोकशाही, समाजवाद, पंचवार्षिक योजनाद्वारे प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात देशाची पत, प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न महान आहे. मानवतावादी व शांततावादी दृष्टीकोनातून त्यांनी केलेली कामगिरी भारताला भूषणावह आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या पाच—दहा वर्षांनी जागतिक शांतता प्रस्थापित करु इच्छिणारा देश अशी भारताची प्रतिमा निर्माण करण्याचे कार्य नेहरुंनी केले. त्यांना देशातील सामान्य गरीब जनतेचा

कधीही विसर पडला नाही. आंतरराष्ट्रीय प्रसिध्दीच्या झोतात ते कधीही अदृश्य झाले नाहीत, तर त्यांनी आंतरराष्ट्रवादात आपल्या राष्ट्रवादाची ज्योत सदैव तेवत ठेवली. भारतीय विकासाच्या यशोमंदिराकडे नेणारा नेता म्हणून सारे जग त्यांना ओळखते.

**निष्कर्ष**

जवाहरलाल नेहरुंनी गांधीजीच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य आंदोलन अधिक जोमाने सुरु केले. भारतीयांत राष्ट्रवादाची भावना प्रज्वलित झाल्याखेरीज भारताला स्वातंत्र्य मिळणे कठीण आहे हे ओळखून त्यांनी अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला आणि जनतेला राजकीय स्वातंत्र्याची गरज पटवून देवून जनतेच्या पाठिंब्यावर आंदोलन उभे केले. पंडित नेहरुंनी जनतेच्या सार्वभौमत्व सत्तेला राष्ट्रवादात महत्त्वाचे स्थान दिले होते. त्यांच्या मते सामाजिक व राजकीय जाणिवेतून प्रत्येक भारतीय व्यक्तीला स्वातंत्र्याची व विकासाची महती समजून येईल. जगात इतर स्वतंत्र राष्ट्रे आहेत, त्याच्याप्रमाणेच आम्हा भारतीयांनाही स्वयं– निर्णयाचा अधिकार असला पाहिजे. आम्ही आमच्या देशाची ध्येय धोरणे, विकासाची कामेकरण्यासाइी समर्थ आहोत. तेव्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आमचे हिरावून घेतलेले स्वातंत्र्य परत घ्यावे आणि आमचा राज्यकारभार आम्हाला करु दयावा अशी आंतरिक तळमळ नेहरुंच्या मनात सदैव चालू होती. ब्रिटिश लोक स्वत:च्या देशात लोकशाही राज्य कारभार करतात, स्वातंत्र्य, समता या तत्त्वांची जोपासना करतात, परंतु बाहेरील देशांत साम्राज्यवादाचे धोरण ठरवून तेथील लोकांचे व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट करु पाहतात, या गोष्टींची भयंकर चीड नेहरुंच्यर मनात होती. त्यामुळेच त्यांना स्वातंत्र्य प्राप्तीची आस अहर्निश लागून राहिली होती.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१ आपटे प्रभा – पं. नेहरु आणि संसदीय परंपरा – मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.

२ जोशी व इतर – पंडित जवाहरलाल नेहरुंचे तत्त्वचिंतन – मॅजेस्टिक प्रकाशन आणि मराठी तत्त्वज्ञान – महाकोश मंडळ, पुणे.

३ मॉरिस जोन्स डब्ल्यू, एच. व इतर–पार्लमेंट इन इंडिया– कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४ कल्याणकार व इतर – पं. जवाहरलाल नेहरु : व्यक्ति आणि कार्य – म.रा.सा.सं.मं., मुंबई.

५ थरुर व इतर –शोध नेहरुंचा आणि भारताचाही –समकालीन प्रकाशन, पुणे.